दै. लोकमत, रत्नागिरी दि.१७ जानेवारी २०२५

# ...करी वंचित

## ...५९ शेतकऱ्यांना किसान सन्मान योजनेची प्रतीक्षा

...र्क

...प्रधानमंत्री योजनेच्या ...लुक्यातील ...ळोली या ...करी वंचित ...रिपब्लिकन ...वले गटाचे ...व तालुका ...डणगडच्या ...देत यावर ...ल घेऊन ...कार्यवाही ...केली आहे. ...नी वारंवार ...न्मान निधी ...नाही. दोन ...शेतकऱ्यांना ...म्हटले आहे. ...शेतकऱ्यांना ...ईकेवायसी

**२६ जानेवारी रोजी उपोषण करण्याचा इशारा**

प्रक्रियेदरम्यान शेतकरी या योजनेपासून वंचित राहिले आहेत. शेतकऱ्यांनी या प्रक्रियेकरिता सादर केलेला सातबारा एका गावाचा असून, नोंदणीमध्ये शेतकऱ्याची जमीन गावापासून सुमारे ३० किलोमीटर दूर अन्य गावात असल्याचे दाखवण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही. प्रशासकीय अभिलेखातील या गलथान कारभारामुळे गेली दोन वर्षे शेतकरी या लाभापासून वंचित राहिले आहेत, असे या निवेदनात म्हटले आहे.

या संदर्भात शेतकऱ्यांनी प्रशासनाला विचारणा केली असता कधी महसूल विभाग, तर कधी कृषी विभाग अशा वेगवेगळ्या खात्यांकडे शेतकऱ्यांना पाठवत आहे. या साऱ्याला कंटाळून शेतकऱ्यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे. तालुक्यातील अन्य गावातील शेतकरीही या कारणामुळे या लाभापासून वंचित राहिले आहेत.

### प्रशासनाच्या गलथान कारभाराचा फटका

प्रशासनाच्या गलथानपणामुळे दोन वर्षांपासून शेतकऱ्यांना किसान सन्मान निधी योजनेच्या लाभांपासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. या शेतकऱ्यांना मागील दोन वर्षांचा लाभ मिळणार का, असा प्रश्न शेतकऱ्यांनी केला आहे.



तालुकास्तरीय हिवाळी क्रीडा स्पर्धेत लंगडीमध्ये विजेतेपद पटकावलेल्या देवधे मणचे शाळेच्या मुलींना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

# लंगडी स्पर्धेत देवधे मणचे शाळेने पटकावले विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**लांजा :** शहरातील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या मैदानावर पार पडलेल्या तालुकास्तरीय हिवाळी क्रीडा स्पर्धेत देवधे मणचे शाळेने लंगडी क्रीडा प्रकारात विजेतेपद पटकावले. संघातील खेळाडूंना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

लांजा, पुनस, भांबेड आणि शिपोशी प्रभागातील खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. लंगडीच्या मोठ्या गटात शिपोशी प्रभागाचे नेतृत्व देवधे मणचे शाळेतील विद्यार्थ्यांनी केले होते. अंतिम सामन्यात भांबेड प्रभागाला पराभूत करून विजेतेपद पटकावले.

**४ प्रभागातील शाळांचा समावेश**

या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक संतोष जाधव, नंदकुमार पाटोळे, सायली तिखे आणि नानासाहेब गोरड यांचे मार्गदर्शन मिळाले. या विजयाबद्दल माजी शिक्षण सभापती चंद्रकांत मणचेकर आणि व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय खेगडे यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले.



...बेलोसे कनिष्ठ महाविद्यालयात भूगोल दिनानिमित्त ...म. गिरमकर यांचे स्वागत करण्यात आले.

# ...विद्यालयामध्ये ...उत्साहात साजरा

...बेलोसे ...न. का. ...कनिष्ठ ...साजरा ...भूगोल ...ली. ...प्रा. जे. ...क्षणाचे ...वापर, ...धुनिक ...केले. ...नाचा ...आर्थिक

समस्यांचे समाधान कसे शोधता येईल, याबाबत प्रोत्साहन दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष पर्यवेक्षक एफ. के. मगदूम यांनी भूगोल विषयावर चर्चा केली. व्ही. एम. वळवी यांनी सूत्रसंचालन केले. युवराज आग्रे यांनी आभार मानले. भूगोल दिनानिमित्त नकाशा रेखाटन स्पर्धा, पोस्टर प्रदर्शन, भूगोलावर आधारित प्रश्नमंजूषा, असे उपक्रम राबवण्यात आले. विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# पवार महाविद्यालयात जयंती साजरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**अडरे :** श्रीराम एज्युकेशन सोसायटीच्या, श्री. आनंदराव पवार कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयामध्ये राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली

कार्यक्रमाची सुरुवात वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या मृणाल पवार व सर्व प्राध्यापकांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करुन राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रा. रुपेश भालेकर यांनी मनोगत व्यक्त केले. पर्यवेक्षक शिवाजी शिंदे यांनी सांगितले की, जाणत्या राजांच्या मागे जानती आई होती एकूणच स्वराज्याच्या निर्मितीबाबत त्यांचा राष्ट्राभिमान हा किती प्रज्वलीत होता हे समजावून सांगितले. प्रा. मयुरी काटकर यांनी राजमाता जिजाऊ यांचे कार्य काव्य रुपात मांडले. प्रा. विक्रांत निवाते यांनी स्वागत केले.


**Auction** Available for Sale

**LEYLAND - BADA DOST I4**

Model 2023 - Vehicle No. MH-08-AP-6691

In as where is condition

Within 5 days

Contact : **Sundaram Finance Ltd.**

Contact : (02352) 221359 / 226430


## गुहागर नगरपंचायत, गुहागर

### जाहीर सूचना

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत शासनाकडून अधिसूचीत करणेत आलेल्या ६५ सेवांचा तपशिल नागरिकांचे माहितीकरिता नगरपंचायत दर्शनीय भागामध्ये फलकाद्वारे प्रसिध्द करणेत आलेला आहे. याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी.

जा.क्र.नपंगु/बाांवि/१२५४/२०२५
नगरपंचायत कार्यालय, गुहागर
दिनांक :- १६/०१/२०२५

(शिक्का)

सही/-
(स्वप्नील चव्हाण)
प्रशासक तथा मुख्याधिकारी,
गुहागर नगरपंचायत, गुहागर.


लोकमत CLASSIFIEDS classified online क्लिक करा बुक करा http://online.lokmatclassified.com

Health of the Day

अत्याधुनिक मशीनद्वारे लैंगिक...